# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.06.2026** **वारःरविवार**

---

- **नैऋत्य मोसमी पाऊस तळकोकणात दाखल**
- **पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्यांच्या बैठकीत भारताचं आर्थिक परिवर्तन आणि दीर्घकालीन विकासात्मक प्राधान्यक्रमावर सविस्तर चर्चा**
- **भारताचं UPI आणि नेपाळची 'नॅशनल पेमेंट्स इंटरफेस' प्रणाली संलग्न**
- **गाझामधील निम्म्याहून अधिक क्षेत्रावर इस्रायलचं नियंत्रण**
- **ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंद 'नॉर्वे चेस' स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आणि**
- **18 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघ तिसऱ्यांदा अजिंक्य**

**<u>नैऋत्य-मोसमी-पाऊस</u>**

नैऋत्य मोसमी पावसाचं काल महाराष्ट्रात आगमन झालं असून तळकोकणात मोसमी पाऊस दाखल झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. साधारणपणे 20 जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात नैऋत्य मोसमी पाऊस सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी नैऋत्य मोसमी पावसानं 25 मे रोजी राज्यात प्रवेश केला होता. यंदा मोसमी पावसाची वाटचाल वेगानं सुरू असून दक्षिण भारतातील संपूर्ण केरळ आणि तमिळनाडू, कर्नाटकचा अर्ध्याहून अधिक भाग तसंच आंध्र प्रदेशच्या दक्षिणेकडील प्रदेश व्यापल्यानंतर त्यानं महाराष्ट्रात प्रवेश केला आहे.

**<u>ईएसीबैठक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्यांची बैठक झाली. या बैठकीत भारताचं आर्थिक परिवर्तन आणि दीर्घकालीन विकासात्मक प्राधान्यक्रम या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सध्याच्या जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीनं विविध कल्पना आणि उपाययोजनांवर आणि पश्चिम आशियातल्या संघर्षाविषयी पंतप्रधानांनी सल्लागार मंडळातील सदस्यांशी चर्चा केली. तसंच जीवनमान अधिक सुकर आणि व्यवसाय सुलभतेसाठी कोणत्या सुधारणा करता येऊ शकतील यावरही बैठकीत चर्चा झाली.

**<u>एलपीजी</u>**

घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या दरात प्रति सिलिंडरमागे 29 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. राजधानी दिल्लीमध्ये घरगुती एलपीजीची किंमत आजपासून 913 रुपयांवरून वाढून 942 रुपये झाली आहे.

**IATA**

आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक संघटनेनं आशिया-प्रशांत क्षेत्रातील विमान वाहतुकीच्या वाढीमध्ये भारत एक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं म्हटलं आहे; या क्षेत्रात विमान प्रवाशांची संख्या 2044 पर्यंत 4 अब्जांच्या वर पोहोचण्याचा अंदाज आहे. IATA चे आशिया-पॅसिफिक क्षेत्रा प्रादेशिक उपाध्यक्ष शेल्डन ही यांनी सांगितलं की, गेल्या काही वर्षांत या क्षेत्रातील विमान वाहतूक क्षेत्राच्या विकासात भारताचं योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. भारत हा जगातील सर्वात वेगानं वाढणाऱ्या देशांतर्गत नागरी विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक असल्याचं त्यांनी नमूद केलं.

IATA 370 हून अधिक विमान कंपन्यांचं प्रतिनिधित्व करते आणि या कंपन्यांचा जागतिक विमान वाहतुकीत सुमारे 85 टक्के वाटा आहे.

**अमित शहा-सीमासुरक्षा**

आंतरराष्ट्रीय सीमेलगतच्या भागात होणारे आर्थिक व्यवहार, इमारतींचं बांधकाम तसंच मालमत्तांच्या खरेदी-विक्रीवर काटेकोरपणे लक्ष ठेवणं आवश्यक असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. शहा यांनी ईशान्येकडील सीमावर्ती भागाच्या सुरक्षिततेसंदर्भात त्रिपुरातील सीमा सुरक्षा दलाच्या मुख्यालयात घेतलेल्या बैठकीत हे निर्देश दिले. सीमा भागात गेल्या पाच वर्षातील जमिनींच्या नोंदी तपासाव्यात असे निर्देशही शहा यांनी या बैठकीत दिले.

**एनटीएखंडन**

2026 च्या पुनर्परीक्षेच्याही प्रश्नपत्रिका फुटल्याच्या किंवा त्या अगोदरच उपलब्ध झाल्याचे काही समाज माध्यमं आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मवरून केले जात असलेले दावे एनटीएनं म्हणजेच राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं फेटाळले आहेत. अशा बातम्या पसरवणं हे संघटितपणे फसवणूक करणाऱ्या टोळ्यांचं कृत्य असून परीक्षेविषयी वाटत असलेल्या चिंतेमुळे विद्यार्थी आणि पालक त्याला बळी पडत असल्याचं एनटीएनं समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. परीक्षा प्रक्रिया अत्यंत सुरळितपणे सुरू आहे त्याचबरोबर परीक्षा कुठल्याही गैरप्रकारांविना पार पडाव्यात याची चोखपणे काळजी घेण्यात येत आहे, असंही एनटीनं नमूद केलं आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन देण्यात येत आहे...**

**भारत-नेपाळ**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांची काल नवी दिल्लीत भेट झाल्यानंतर, 2015 मधील भूकंपानंतरच्या पुनर्बांधणी कार्यक्रमांतर्गत 72 आरोग्य सुविधा आणि 12 सांस्कृतिक वारसा प्रकल्प भारतानं नेपाळला सुपूर्द केले. सीमापार वैयक्तिक रोख हस्तांतरण सुलभ करण्यासाठी, भारताची 'यूपीआय' प्रणाली आणि नेपाळची 'नॅशनल पेमेंट्स इंटरफेस' प्रणाली यांच्यातील परस्पर जोडणीचा दोन्ही नेत्यांनी शुभारंभ केला. तसंच, नेपाळसाठी 'व्हॉइस फर्स्ट' भाषा अनुवाद मंचाकरिता 'राष्ट्रीय डिजिटल पायाभूत सुविधा' संयुक्तपणे विकसित करण्यासाठी 'डिजिटल इंडिया भाषिणी' आणि 'काठमांडू विद्यापीठ' यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराची त्यांनी देवाणघेवाण केली.

**सुगियोनो**

इंडोनेशियाचे परराष्ट्र मंत्री सुगियोनो, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत भारत-इंडोनेशिया संयुक्त आयोगाच्या आठव्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवण्यासाठी नवी दिल्लीत दाखल झाले आहेत.

**<u>इस्रायल-गाझा</u>**

गाझामध्ये इस्रायलनं केलेल्या हल्ल्यात दोन महिलांसह किमान सात पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, तणावपूर्ण स्थितीत असलेल्या युद्धविराम कराराच्या रक्षणाबाबत हमास आणि इतर गटांसोबत चर्चा करण्यासाठी कैरोमध्ये मध्यस्थांनी पुन्हा वाटाघाटी सुरू केल्या आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनं झालेला युद्धविराम इस्रायलचे हल्ले रोखण्यात अपयशी ठरला असून, या भागातील निम्म्याहून अधिक क्षेत्रावर आता इस्रायलचं नियंत्रण आलं आहे.

**<u>सेंट-पीटर्सबर्ग</u>**

रशियाच्या वार्षिक आर्थिक परिषदेचा समारोप होत असतानाच, युक्रेननं सेंट पीटर्सबर्ग शहर आणि त्याच्या आसपासच्या परिसरावर अभूतपूर्व हल्ला केल्याचं रशियन अधिकाऱ्यांनी सांगितलं. लेनिनग्राड प्रांतात 140 हून अधिक ड्रोन्स पाडण्यात आल्याची माहिती गव्हर्नर अलेक्झांडर ड्रोझडेन्को यांनी दिली; तसंच, चार वर्षांपूर्वी युद्ध सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच, शहराच्या गव्हर्नरनी नागरिकांना घराबाहेर न पडण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>तेलंगणा-महिला सुरक्षा</u>**

महिलांची सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन यांना मोठी चालना देण्याच्या उद्देशानं, तेलंगण महिला सुरक्षा विभागानं 'स्त्री राइड' हा एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत केवळ महिला चालकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या कॅब्स, रिक्षा आणि इलेक्ट्रिक बाइक्सची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पोलीस महासंचालक सी. व्ही. आनंद यांच्या हस्ते या उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या सुविधेमुळं महिला प्रवाशांना ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या लोकप्रिय ॲप्सद्वारे, केवळ महिला चालकांनी चालवलेल्या गाड्यांची सेवा बुक करणं शक्य होणार आहे.

**<u>भारत-अफगाणिस्तान कसोटी क्रिकेट</u>**

अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात, न्यू चंदीगड इथं आज दुसऱ्या दिवशी भारत आपल्या पहिल्या डावात 3 बाद 368 धावांवरून खेळाला सुरुवात करेल. के.एल. राहुल आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या शतकांमुळं भारताची स्थिती भक्कम झाली. साई सुदर्शननं 81 धावांचं योगदान दिले.

**<u>क्रिकेट</u>**

आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यातील टी 20 क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली असून श्रेयस अय्यरची कप्तानपदी निवड करण्यात आली आहे. तिलक वर्मा संघाचा उपकप्तान असेल. 15 वर्षांच्या वैभव सूर्यवंशीला संघात स्थान देण्यात आलं असून गेल्या काही काळातील खालावलेल्या कामगिरीमुळं सूर्यकुमार यादवला कप्तान पदासोबतच संघातील स्थानही गमवावं लागलं आहे.

**<u>बुद्धिबळ</u>**

बुद्धिबळात, ग्रँडमास्टर वीस वर्षीय आर. प्रज्ञानानंद यानं ओस्लो इथं जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरचा अंतिम फेरीत पराभव करून 'नॉर्वे चेस' स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरण्याचा इतिहास रचला आहे. एकंदर

18 गुणांसह त्यानं विजेतेपद मिळवलं. 2013 मध्ये ही स्पर्धा सुरू झाल्यापासून भारताचे दिग्गज खेळाडू विश्वनाथन आनंद आणि विद्यमान जागतिक विजेता डी. गुकेश यांनाही हे अजिंक्यपद आजवर साध्य करता आलं नाही.

**हॉकी**

जपानमध्ये सुरु असलेल्या 18 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं यजमान जपानचा 4-1 असा पराभव उडवत तिसऱ्यांदा चषक जिंकला आहे. भारतासाठी, आशिष पूर्तीने हॅट-ट्रिक साधली, तर कर्णधार केतन कुशवाहानं दुसरा गोल केला. यजमान संघाकडून गाकू नुमाडानं एकमेव गोल केला.
दरम्यान, मुलींच्या संघानं दक्षिण कोरियाला 3-0 असं हरवून कास्यपदक पटकावलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील एका पोस्ट द्वारे भारताच्या दोन्ही संघांचं अभिनंदन करून त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार